## प्रेसनोट दि.२७/०८/२०१९

## लष्कर पोलीस स्टेशन पुणे

## घरफोडी गुन्हयांतील मुद्देमाल जप्त केले बाबत.

दि.२४/०८/२०१९ रोजीतपास पथकातील पोहवा. ३१२५ शितोळे व पो.शि. ८८०५ पठाण यांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीवरुन इसम नामे शाहाबाज रफिक शेख, वय-२३ वर्षे, रा. जनता बेकरी जवळ, फिलीप्स चाळ, सर्व्हे नं-१५०, घोरपडी गाव, पुणे याने लष्कर पोलीस स्टेशन गुरन २००/२०१८ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८० हा गुन्हा केल्याची व नमुद गुन्हयातील चोरीस गेलेले साहित्य किं.रूपये २०,०००/- चा माल त्याचेकडे असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या महितीवरुन तपास पथकाची प्रभारी, सी.एम.सुर्यवंशी, सहा.पो.निरीक्षक, पोहवा ३१२५ शितोळे, पोना.२१५१ लांडगे, पो.शि.९८१५ भोसले, पो.शि. ८८०५ पठाण व पो.शि.९८२९ धावडे,पो.शि.८९२९ शिंगे,पो.शि.७३३०राऊत, पो.शि.९८१८ हुवाळे असे नमुद इसमाच्या वर नमुद ठिकाणी राहत्या घरीगेले असता शाहाबाज रफिक शेख हा सदर ठिकाणी मिळुन आल्याने त्यांस लागलीच स्टाफच्या मदतीने ताब्यात घेऊन दाखल गुन्हयातील चोरीस गेलेल्या माला बाबत त्याचेकडे विचार पूस केली असता तो त्याने चोरी केलेला माल घरातच ठेवल्याचे सांगुन समक्ष हजर केल्याने आम्ही स्टाफच्या मदतीने लागलीच दोन पंचाना बोलावुन सदरबाबत माहिती देवुन ताब्यात घेतलेल्या वरील इसमाकडुन गुन्हयातील चोरीस गेलेला एक सीपीयु, एक मॉनीटर,एक की-बोर्ड, एक प्रिंटर असा किं.रूपये २०,०००/-माल पंचनाम्याने जप्त केला आहे.त्यानंतर सदर आरोपीस नमुद स्टाफच्या मदतीने लष्कर पोलीस स्टेशन,पुणे येथे आणुन दि.२४/०८/२०१९ रोजी २०.३० वा अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस उप आयुक्त, श्री शिरीष सरदेशपांडे साो, परि.२ पुणे व मा.सहा.पोलीस आयुक्त, श्री रविंद्र रसाळ,लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शना खाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री चंद्रकांत भोसले साो, यांचे व पोलीस निरीक्षक, गुन्हे श्रीमती माया देवरे नेतृत्वाखाली तपास पथकाचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक श्री सुर्यवंशी यांनी व वर नमुद कर्मचा-यांनी केलेली आहे.